Friday, September 24, 2010

**'Peroration of death' shows the warning on tobacco pocket**

Publication: Saamana, Edition: Pune, Journalist: Bureau, Page No: 5, Location: Bottom-Left, Width(cms): 20, Height(cms): 6, Size(sq.cms): 120

# तंबाखूच्या पाकिटावर कॅन्सरग्रस्तांचे फोटो लावा

## रुग्णांची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - कर्करोगामुळे आमचा मृत्यू होणार. पण इतरांना तरी वाचवा. तंबाखूजन्य पदार्थांच्या पाकिटावर विंचवाऐवजी आमचे फोटो लावा, अशी कळकळीची मागणी कर्करोगग्रस्त रुग्णांनी केंद्रीय आरोग्य विभागाला केली.

टाटा रुग्णालयात दुसऱ्या ‘तंबाखू आणि आरोग्य राष्ट्रीय परिषद’चे उद्घाटन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री दिनेश तिवारी यांच्या हस्ते आज झाले. त्याप्रसंगी १५० रुग्णांनी त्यांना हे मागणीचे निवेदन दिले. तंबाखूयुक्त पदार्थांच्या पाकिटावरील धोक्याचा इशारा सत्याशी निगडित असावा म्हणून त्यावर आमचे फोटो लावा, धोक्याच्या इशाऱ्यांसाठी पाकिटाच्या दोन्ही बाजूंना ५० टक्के जागा असावी, छुप्या जाहिरातींवर बंदी आणण्याच्या आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करा आणि शाळांपासून १०० यार्डाच्या अंतरावरील तंबाखूची दुकाने हटवा, अशा मागण्या रुग्णांनी केल्या.

या मागण्यांचा गांभीर्याने विचार करण्याचे आश्वासन देतानाच त्रिवेदी यांनी तंबाखूच्या पाकिटांवर ‘मृत्यूचे सामान’ असा इशारा देण्याबाबत प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सलाम बॉम्बे फाऊंडेशन, हेलीस सेखसीरया इन्स्टिट्यूट यांनी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या परिषदेत तंबाखू नियंत्रणाचे कार्य करणारे देश-विदेशातील १५० कार्यकर्ते व संशोधक सहभागी झाले आहेत. उद्घाटनप्रसंगी डॉ. सुरेंद्र शास्त्री, डॉ. प्रकाश गुप्ता, पद्मिनी सोमानी आदी मान्यवर उपस्थित होते. तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी उदरनिर्वाहासाठी इतर उत्पादनांकडे वळावे यासाठी कृषी मंत्रालयाने योजना आखावी, असे पत्र आपण देणार असल्याचे आरोग्य राज्यमंत्री त्रिवेदी यांनी यावेळी सांगितले.